International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# तीन दगडाची चुल आत्मकथनातील स्त्रीचे जीवन

**डॉ. देठे मीरा माधवराव**
*सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख,*
*मराठी विभाग, दहिवडी कॉलेज, दहिवडी*
*Corresponding Author –* डॉ. देठे मीरा माधवराव
**DOI - 10.5281/zenodo.18654198**

**प्रस्तावना:**

लेखकांनी आपल्या आयुष्यातील वजनदार अशा अनुभवानी दलित साहित्याला एका उंचीवर नेऊन ठेवलेले आहे. मराठी साहित्यामध्ये १९६० नंतर शिक्षण घेतलेली दलित समाजातील पहिली पिढी स्वतंत्र विचार करायला लागली आणि या विचार मंथनातून स्वतःचा आत्मशोध,आत्मभान, आलेल्या या पिढीने स्वतः जगलेले, भोगलेले, कष्टप्रद, अन्यायकारक, दुःखद, नाकारलेले, गावकुसाबाहेरचे, ठोकरलेले, जीवन पहिल्यांदाच मराठी साहित्यामधून मांडायला सुरुवात केली. हे सर्व मांडणे म्हणजेच दलित साहित्य होय. दलितांनी भोगलेले, दलितांना आत्मभान देणारे, आत्मशोध घ्यायला लावणारे,आपल्याला जे अन्यायकारक आहे ते नाकारणारे आणि आपल्याला जे विकासाच्या मार्गाला नेणार आहे सुखद ठरणार आहे असे साहित्य म्हणजेच दलित साहित्य होय. दलित साहित्य प्रवाह हा इतर साहित्य प्रवाहांच्या सोबतीने मोठ्या जोमाने मराठी साहित्यविश्वामध्ये येऊन दाखल झाला. प्रथम कविता नंतर कथा, कादंबरी, नाटक यांनी सुरू होणार हा प्रवास दलित आत्मकथनांच्या पर्यंत येऊन पोहोचला आणि बघता बघता दलिता आत्मकथन हे इतर साहित्य प्रकारांपेक्षा कधी वरच ठरले हे जाणवलेच नाही. दया पवार-बलुतं, लक्ष्मण माने -उपरा, शंकरराव खरात- तराळ अंतराळ, प्र.ई. सोनकांबळे- आठवणींचे पक्षी, पार्थ पोळके -आभरण, लक्ष्मण गायकवाड -उचल्या, शरणकुमार लिंबाळे -अक्करमाशी, नारायण सुर्वे- यादगार, नामदेव ढसाळ -खरंतर , बाबुराव बागुल -आम्हीही माणसं आहोत, किशोर शांताबाई काळे -कोल्हाट्याचं पोर, वामनदादा कर्डक -जग बदल घडवणारा, अशी अनेक पुरुष आत्मकथने मराठी साहित्यामध्ये लिहिले गेले आणि या आत्मकथनाने आपले स्वतःचे अस्तित्व सिद्ध केलेले आहे. दलित साहित्यामध्ये दलित आत्मकथनांनी स्वतःचा एक इतिहास घडवलेला आहे.

**दलित साहित्य आणि स्त्री आत्म कथने:**

या दलित लेखकांच्या सोबतच दलित स्त्रीलेखिका सुद्धा मागे राहिलेल्या नाहीत. दलित पुरुषांच्या सोबतीनेच शिक्षण घेतलेल्या, आत्मभान आलेल्या,दलित स्त्रियांनी सुद्धा आत्मकथनाच्या माध्यमातून दलित साहित्यामध्ये मोलाची भर घातलेली आहे. बेबी कांबळे -जिन आमचं, विमल मोरे -तीन दगडाची चुल, उर्मिला पवार -आयदान, शांता गोखले- आम्हीही माणस आहोत, बेबी कांबळे माझीजडणघडण, शांता गोखले- जगण्याची लढाई, सुनिता कांबळे -संघर्ष मुक्ता सर्वगोड -मिटलेली कवाड या अनेक स्त्रीयांनी आपली आत्मभानातून आपले अनुभव शब्दबद्ध केले आहेत.

**दलित स्त्रीआत्मकथनाचे वेगळेपण:**

**विमल मोरे व तीन दगडाची चुल:**

कुठल्याही घरामध्ये अन्न शिजवण्यासाठी चुल असते ती चूल घराच्या एका कोपऱ्यामध्ये व्यवस्थित एका जागी बसवलेली असते. स्वयंपाक झाल्यानंतर ती झाडून स्वच्छ केली जाते, काही ठिकाणी तिला पांढऱ्या मातीने गिलावा देऊन पोतेरे फिरवुन आकर्षक करण्याचा प्रयत्न केला जातो. कारण स्वयंपाक करण्यासाठी ती तिला परत वापरता यावी. चुल असेल तर घराला घरपण असतं असा पारंपारिक विचार आहे. परंतु भटक्या आणि विमुक्त अशा समाजाची मात्र राहण्याची जागा निश्चित नसते, एका गावातून दुसऱ्या गावात मजल तर मजल करत ही माणसं जगत असतात. गावातील लोकांनी परंपरेने आखून दिलेले व्यवसाय करणे व त्या बदल्यात गावातल्या लोकांकडुन अन्नधान्य भाजीपाला घेणे हाच त्यांचा जीवनक्रम. भीक मागुन आणलेले अन्नधान्य शिजवण्यासाठी मात्र त्यांना गावकुसाबाहेरच्या माळावर बांधलेल्या झोपडीच्या समोर तीन दगड मांडून चुल स्वयंपाक करावा लागतो. जोपर्यंत त्या गावी मुक्काम असतो तोपर्यंत त्याच तीन दगड मांडून केलेल्या चुलीवर ही मंडळी अन्न शिजवून खातात.तिथला मुक्काम संपला की ह्या लोकांच्या राहण्याच्या खुणा पाला बाहेरच्या या तीन दगडांच्या चुलीमुळे सर्वांच्या निदर्शनात येतात. ही चुल त्यांना सोबत नेता येत नाही किंवा एका ठिकाणी जमिनीमध्ये स्थिर करताही येत नाही अशा या तीन दगडांची चुल म्हणजेच भटक्या अस्थिर जीवनाचे प्रतीक होय. कधी कधी तर घरामध्ये धान्य आलेच तरच चुल पेटली जाते धान्य मिळाले नाही तर मात्र ती चूल तशीच थंडगार राहते. अशावेळी या भटक्या विमुक्त लोकांना उपाशीपोटी राहावे लागते.

विमल मोरे यांनी तीन दगडाची चुल हे प्रतिक मांडून आपले तीन दगडाची चुल हे आत्मकथन लिहिले आहे. भटक्या विमुक्तांचे समाज सुधारक मा. दादासाहेब मोरे यांच्या सौभाग्यवती म्हणजे सौ.विमल मोरे आपले पती मोठे समाज सुधारक, विद्वान, शिक्षणाचा ध्यास घेणारे आहेत. आपल्या भटक्या समाजातील माणसांमध्ये त्यांची पत प्रतिष्ठा आहे, आपल्या समाजातील लोकांनी सुधारण्यासाठी ते सतत प्रयत्न करत आहे. याचा त्यांच्या सोबत असतानाचा अनुभव विमलताईंना आहेच परंतु आपल्या लग्नानंतर पतीने शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले, आपली स्त्री म्हणून आपणास ओळख दिली आहे.विमलताईना शिक्षणाने आलेले आत्मभान हे तीन दगडांच्या चुलीमधून व्यक्त झालेले दिसतेच यात भुतकाळातील आपले अनुभव व भविष्यात जगणारा आपला समाज त्यांच्या हलाकीचे, व्यथ्येचे चित्रण असे दुहेरी चित्रण यात रेखाटले आहे.

**विमल मोरे यांचे जीवन:**

विमल ताईंचा जन्म झाला चार पाच भावंड असणार्या घरात झाला. आई वडिलांचे मजल दर मजल असा मुक्काम करत जगाणरे फिरस्ती जीवन. विमलला शाळेमध्ये घातली असल्या कारणाने मोठ्या भावाने आल्या घरी त्यांना कोल्हापुरात ठेवुन घेतले. त्या काळातील रूढी परंपरेनुसार १०-१५ व्या ववर्षी विमलचे लग्न करून टाकले म्हणजे आपली जबाबदारी संपली हा आई-वडिलांचा विचार असतो, परंतु त्यांच्या भावाला मात्र विमलने शिकावे, स्वतःच्या पायावर उभे राहावे जअशी इच्छा असते. त्यांच्या आसपासची पाहुणेमंडळी विमलच्या लग्नासाठी विचारपूस करतात,आपण शिकावे का लग्न करावे याबाबत मात्र विमल ठाम निर्णय घेऊ शकत नाही. शाळेपेक्षा भटकांती जीवन तिला आवडते. चार भिंतीत राहून शिक्षकांनी जे काही शिकवले ते मन लावून शिकणे तिला सुरुवातीच्या काळामध्ये आवडत नाही. तिचा भाऊ मात्र तिने खूप शिकावे म्हणून प्रयत्न करतो.तिला लग्नासाठी स्थळ येतात पण मोठा व छोटा भाऊ तिचे लग्न करायचे नाही असे सांगुन त्यांना परत पाठवतात.

इयत्ता ९वीत असताना पाहुणे मंडळींच्यापैकी काही स्थळ तिला पाहिला येतात तिच्या लग्नाविषयी चर्चा सुरू होते मग मात्र आपल्याच समाजातील शिकलेला सुधारकी विचारांचा मुलगा दादा मोरे यांच्याशी विमल मोरे हिचा विवाह होतो. विमल ताईंचा विवाह दादा मोरे यांच्याशी झाला लग्नानंतर आपले माहेरचे जीवन आणि सासरचे जीवन यामध्ये विमल ताईंना जमीन आसमान चा फरक दिसतो. सासरचे सुधारकी विचारांचेवातावरण नवऱ्याचा शिक्षणावरचा असलेला गाढ विश्वास, एक समाजमान्य प्रतिष्ठीत लेखक अशी दासाहेब मोरे यांची ओळख यामुळेच विमलताई पुढील शिक्षण घेवु शकतात. सासरच्या घरामध्ये नवऱ्याने आणलेली मोठी मोठी पुस्तके पाहून तिच्या मनात शिकण्याची आवड निर्माण होते. दादासाहेब मोरे व त्यांची आई सुद्धा तिला आडकाठी आणत नाही. मग शिक्षित झालेली ही विमल तीन दगडाची चुली या माध्यमातून आपल्या समाजाचे समाजातील स्त्रियांचे दुःख शब्दबद्ध करते.

'तीन दगडाची चुल' यामध्ये विमलने आपले बालपण मांडलेले आहे हे बालपण मांडत असतानाच आपली भावंडे आपले आई-वडील आपल्या बालपणीच्या अनेक घटना त्यांनी सांगितल्या आहे. आपल्या दोन्ही वैनीं पैकी मोठी वहिनी आपल्यावर आईप्रमाणे माया करते स्वतःला मुल नसलं तरी ननंद आणि दिरावर मात्र ते मायेची पाखरं धरते. तर दुसरीकडे मात्र तिची दोन नंबरची वैनी मात्र लग्न झाल्यानंतर लगेचच माझा नवरा सगळ्याच माणसांचे सांभाळणार नाही, माझे मी वेगळे राहते असा हट्ट करते आणि नुसता हट्ट करत नाही तर आपले वेगळे बिऱ्हाड मांडते. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे माणसाच्या नात्यांच्या मध्ये पडणारा तेढ विमलताईंनी आपल्या स्वतःच्या वहिनी आणि भाऊ यांच्या स्वभावातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या आसपासच्या स्त्रियांचे चित्र मांडत असताना त्या म्हणतात... भटक्या विमुक्तांच्या स्त्रिया म्हणजे ज्या गावी मुक्कामाला गेले आहे त्या गावच्या पुरुष मंडळींच्या हक्काच्या स्त्रीया असतं .,अशावेळी गावाच्या बाहेर माळरानावर पालं बांधून राहणारे या फिरत्या लोकांच्या स्त्रियांना अंघोळीसाठी मजबूत आडोसा नसायचा अशावेळी जुनी कापड बांधुन आडोसा केला जाई ...त्यातच अंगावर धड लुगडी नसायची अशावेळी जाणारी येणारे मंडळी मुद्दामच या स्त्रिया आंघोळ करत असताना घुटमळत, तर कधी फाटक्या लुगड्यातुन डोकावणारे तरुण शरीरे न्याहळत थांबत. त्यांना आडवणारे कोणी नसे अशावेळी या स्त्रियांना मात्र आपले जगणे नकोसे वाटे,तरीही लाज लज्जा बाजूला ठेवून त्यांना आपले कामे करावी लागत. कधी कधी एखादी दुसरी धाडशी स्त्री मात्र घुटमळत असणाऱ्या लोकांना चार शब्द सुनावे. परंतु स्वभावाने भित्री असेल तर मात्र अशा स्त्रियांना मात्र जगणे मुश्किल व्हायचे. या मंडळींचा उदरनिर्वाह म्हणजे गावामध्ये भिक्षा मागून जे पदरात पडेल तेच खाणे... कधी मिळालं तर मिळालं नाही तर कधीकधी रिकामे हाताने सुद्धा ही मंडळी येत. अशावेळी मात्र घरामध्ये असणारे छोटी मुले वृद्ध माणसे त्यांच्यावर मात्र उपासमारीचे वेळ येई. मग ही छोटी मुलं जो काही रानमेवा उपलब्ध असेल ते खाऊन पोट भरायचे मग चिंचा,बोरे, कवठे, पेरु, विलायती चिंचा हीच त्यांना पोटाचा आधार म्हणून अशावेळी उपयोगी पडत.

विमल त्यांचे पती दादासाहेब मल्हारी मोरे हे 'गबाळकार' म्हणून प्रसिद्ध लेखक होते. त्यांचे 'गबाळ' हे आत्मकथन साहित्य अकादमी व महाराष्ट्र शासनाने गौरविण्यात आलेले होते. अशा वेळेला दादासाहेब मोरे यांच्या पत्नी म्हणून विमल ताई सुद्धा समाजकार्यामध्ये हिरीरिने भाग घेत असत. आपल्या समाजामध्ये चालत आलेल्या रूढी परंपरा, बालविवाह,मूल होत नाही म्हणून स्त्रीचा होणारा जाच, सासू-सासऱ्यांचा सासुरवास, अंधश्रद्धा, आशिक्षीतपणा, अज्ञान हे सगळे त्यांनी जवळून अनुभवलेलं होते.त्या स्वतः आजारी असताना आई-

वडिलांनी त्यांना दवाखान्यात न नेता देवरूष्याकडे नेले होते त्यावेळी आजार कसा वाढला होता. अशावेळी भावाने देव देवाशी न पाहता लगेचच दवाखान्यात नेऊन औषधोपचार करून त्यांना वाचवले हा अनुभव पाठीशी असल्याने त्यांनी आपल्या समाजातील लोकांच्या मनातील अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला. आपल्या मोठ्या बहिणीला होणार सासुरवास त्यांनी जवळून पाहिला होता.नात्यातल्या एखाद्या स्त्रीला लग्नानंतर लगेचच मूल झाले नाही तर तिचा नवरा दुसऱ्या लग्न करून मोकळा होईल परंतु अशा स्त्रीला मात्र सवती सोबत संसार करताना असताना किती यातना सहन कराव्या लागतात हे विमल ताईंनी जवळून पाहिलेले होते.आपली आई,आजी, वहिनी, बहीण, शेजारीपाजारीच्या अनेक स्त्रिया त्यांच्या या आत्मकथनातून आपल्याला पहावयास मिळतात. एक स्त्री म्हणून स्वतःला आलेले आत्मभान आणि एक माणूस म्हणून आपल्या समाजातील समस्त स्त्रीवर्गाने जागरूक व्हावे यासाठी विमल त्यांनी केलेले प्रयत्न असेल दुहेरी पद्धतीने ही आत्मकथनाचा विषय मांडलेला आहे.

स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्यामध्ये दलिता आत्मकथनांनी सामाजिक वास्तवाला जे नवीन परिणाम दिलेले आहे या परंपरेत विमल मोरे यांचे तीन दगडाची चूल हे आत्मकथन विशेष महत्त्वाचे ठरले आहे. हे आत्मकथन केवळ लेखिकेच्या वैयक्तिक जीवनाचे कथन न राहता दलित समाजाच्या सामूहिक वेदना, संघर्ष आणि आत्मसंरक्षणाचे प्रतिनिधित्व करते. या तीन दगडाची चूल या आत्मकथनाचे सामाजिक साहित्यिक व समीक्षात्मक अंगाने विश्लेषण करण्यात येते.

**शिर्षकाची प्रतिकात्मकता:**

'तीन दगडाची चूल' हे शीर्षक अत्यंत अर्थ गर्भ आहे, ग्रामीण दलित कुटुंबातील चुली केवळ स्वयंपाकाचे साधन नसून ती दारिद्र्य, उपासमार, कष्टमय जीवन, आणि स्त्रीच्या अखंड श्रमाचे प्रत्येक आहे, तीन दगडांवर उभी असलेली ही चूल जशी अस्थिर उभी राहते तसेच दलितांचे जीवनही असुरक्षित व संघर्षमय असल्याचे प्रतिकात्मक चित्रण यामध्ये पाहायला मिळते. त्याबरोबरच चुलीमुळे घराला जशी उष्णता, उबदारपणा मिळतो त्याचबरोबर ही उष्णता जास्त झाली तर तिचे चटकेही अनुभवावे लागतात हेच या चुलीचे प्रतीक आहे.

**तीन दगडाची चूल आत्मकथनाचे वेगळेपण**:

भटक्या विमुक्त 'गोंधळी' समाजातील 'कुरमुडे जोशी' या उपेक्षित भटक्या जमातीचे प्रतिनिधित्व करणारे विमल विमल मोरे यांचे तीन दगडाची चूल हे आत्मकथन २००० सालामध्ये प्रसिद्ध झाले 'तीन दगडाची चुल' मधील कथा उपेक्षित अशा भटक्या विमुक्तांच्या म्हणजेच कुरमुरे जोशी या समाजातील जन्माला आलेल्या विमल मोरे की ज्यांचे माहेरचे नाव विमल नामदेव भोसले. या समाजातील पुरुषवर्ग गळ्यात अंबाबाईचा फोटो अडकून एका हातात कडमडं घेऊन दुसऱ्या खांद्यावर झोळी टाकून भीक मागत भविष्य सांगत गावोगावी भटकणे हे या समाजाचे प्रारब्ध, उपजीविकेचे साधन म्हणून ही भटकी जमात आहे. कोल्हापूर शहराजवळील कळंबा येथील मध्यवर्ती कारागृहाच्या जवळ असलेल्या पाटील नावाच्या झोपडपट्टीत पालामध्ये हे कुटुंब राहत होते. विमलताई मोठा भाऊ अशोक स्वखर्चाने शिकून पोलीस खात्यामध्ये नोकरी करत असल्याकारणाने आपल्या समाजातील लोकांनी लाजिरवाणे जीवन जगणे त्याला अपमानास्पद वाटते. त्यामुळेच आपल्यापेक्षा धाकटे भाऊ बहिणी यांना शिकवुण स्वतःच्या पायावर उभे करणे हाच ध्यास अशोकने घेतलेला असतो. भावंड लिंगप्पा, मरिअप्पा, विमल आणि मंगल यांनी शिकावे, दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, याला धुक्यांना दूर सारून चांगले आयुष्य जगावे. असा ध्यास अशोकने घेतलेला असतो. आपल्या छोट्या बहिणीने आई-

वडिलांच्या सोबत गावोगाव भटकणे हे अशोकला मान्य नसते म्हणूनच तो तिला आपल्याकडे ठेवून घेतो आणि आई-वडिलांच्या सोबत पाठवण्यास नकार देतो. अशोकची पत्नी सुमती ही विमलताईला स्वतःच्या मुलीप्रमाणे वाढवलेले असते. विमलच्या प्रवेशासाठी स्वतःकडे पैसे नसतानाही शेजारणीकडून सव्वा रुपया घेऊन ती विमलचा शाळेचा प्रवेश घेते. यासोबतच अशोक व सुमितीने विमलच्या लग्नाच्या बाबतीत सुद्धा काही निर्णय घेतात. विमलचे लग्न करण्यासाठी वारंवार स्थळ शोधतात परंतु आपल्या बहिणीचे लग्न योग्य वेळातच व्हावे योग्य माणसाशी व्हावे असा ठाम निर्णय हे पती-पत्नी घेतात. नववी मध्ये शिकत असताना ज्यावेळेस विमलताईंना दादासाहेब मोरे यांचे स्थळ येथे त्यावेळी मात्र अशोक सुमती आपल्या समाजातील सुधारलेल्या विचारांचा शिकलेला आणि आर्थिकदृष्ट्या भविष्यात संपन्न होणारे अशा मुलाचा विचार करतात

या आत्मकथनामध्ये ग्रामीण परंतु भटक्या विमुक्त समाजातील जातीय विषमता,अस्पृश्यता, आर्थिक शोषण व सामाजिक अन्याय याचे वास्तववादी चित्रण केले आहे. यात लेखिकेने अनुभवलेले अपमान, शिक्षणातील अडथळे, उपजीविकेसाठीची संघर्षमय वाटचाल यात पहावयास मिळते. ही केवळ एकटी विमलची कथा न राहता संपूर्ण भटक्या विमुक्त समाजातील स्त्रियांचे ती प्रतिनिधित्व करते. विमल मोरे यांची आई, आजी, बहीण, वहिनी व आसपासच्या स्त्रीपात्रांच्या मधून दलित परंतु भटक्या विमुक्त स्त्रीचे दुहेरी शोषण ( जात व लिंग) स्पष्ट होते.स्त्री ही घर आणि समाज या दोन्ही पातळ्यांवर कष्ट करते स्त्रीचे स्वातंत्र्य,आत्मभान किंवा स्वानुभव मर्यादित स्वरूपात या आत्मकथनातून मांडला गेलेला आहे ही या आत्मकथनाचे मर्यादा मानता येईल. हे आत्मकथन भटक्या विमुक्त समाजाच्या वेदनांचे दस्तऐवजीकरण करते. अन्यायाविरुद्ध प्रश्न उपस्थित करणे. वाचकात सामाजिक जाणीव निर्माण करणे ही याची प्रमुख भूमिका आहे. त्यामुळे ती तीन दगडाची चूल हे केवळ साहित्यिक नव्हे तर सामाजिक परिवर्तनाचे ही साधन ठरते.

**निष्कर्ष:**

विमल मोरे यांचे तीन दगडाचे चूल हे मराठी दलित आत्मकथन साहित्यातच केवळ महत्त्वाचे झाले नाही तर व्यक्तिगत अनुभवांच्या आधारे दलित समाजाच्या सामूहिक वेदना आणि संघर्ष प्रभावीपणे मांडणारे हे आत्मकथन सामाजिक वास्तवाचा आरसा आहे. यामुळेच मराठी साहित्याच्या सामाजिक भूमिकेला हे आत्मकथन नवीन गती देते.

**संदर्भसूची:**

१. मोरे, विमल तीन दगडाची चुल, मुंबई प्रकाशन.
२. लिंबाळे, शरणकुमार, दलित आत्मकथन साहित्य- स्वरूप व आशय, औरंगाबाद, प्रतिभा प्रकाशन
३. लिंबाळे, शरणकुमार दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र, पुणे, श्रीविद्या प्रकाशन
४. गायकवाड, लक्ष्मण उचल्या, मुंबई, ग्रंथालय प्रकाशन.
५. आंबेडकर,डॉ. बाबासाहेब, जाती निर्मूलन, मुंबई भारत भूषण प्रकाशन.
६. पवार, अरुण मराठी दलित साहित्य स्वरूप आणि वाटचाल, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन.
७. जाधव,बाबुराव दलिता आत्मकथन- परंपरा,पुणे, मेहता ब्लिशिंग हाऊस.
८. देशमुख, सुहास स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य,पुणे, कॉन्टिनेटंल प्रकाशन